# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कोळगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) धरण परिसरातील शेतीपंपाच्या नियमबाह्य वीज देयकाबाबत

**(१) ३९६३ (१५-०१-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि. सोलापूर)तालुक्यातील कोळगांव धरण लाभक्षेत्र परिसरातील शेतीपंप वीज ग्राहक शेतकऱ्यांकडून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या कालावधीत वीज पुरवठा खंडीत केले असताना वीज बील आकारणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत वीज ग्राहकांना वीज बिलाचे पैसे परत देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, प्रत्यक्ष वीजेचा वापर व वीज बील आकारणी यातील तफावत दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस, संबंधित वीज ग्राहकांना दिलेली वीज देयके सुधारित करुन देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ब्रम्हपूरी येथील आदिवासी मुलांच्या वसतीगृह इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(२) ५४५४ (१०-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग रोहयो, चंद्रपूर यांनी ब्रम्हपूरी येथील आदिवासी मुलांच्या वसतीगृह इमारतीचे बांधकाम करण्यासाठी नकाशा, अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करुन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास विभाग चंद्रपूर यांच्या मार्फत अंतिम मंजूरीसाठी आयुक्त कार्यालय आदिवासी विकास विभाग नाशीक यांच्याकडे पाठविलेला असतांना ही सदर प्रस्तावास अधापही मंजुरी मिळालेली नसल्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी मा. आदिवासी विकास मंत्री, प्रधान सचिव आदिवासी विकास, आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांना दिनांक ५ जानेवारी २०१५ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांच्या सोबत वारंवार दुरध्वनीवरुन संपर्क केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रस्तावास निधीसहीत मंजूरी मिळण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१७)** : (१) होय.

(२), (३) व (४) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह बांधकामाबाबतचे अंदाजपत्रक व आराखड्यांची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत छाननीही झाली आहे.

तथापि, आदिवासी विकास विभागांतर्गत बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन झाल्यावर ब्रम्हपूरी येथील वसतिगृहाचे अंदाजपत्रक जुन्या दरसूचीच्या आधारे तयार केल्याचे निदर्शनास आल्याने चालु दरसूचीच्या आधारे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी पुनश्च क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहे.

या दरम्यान उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीत मा.मुख्य सचिव महोदयांनी अल्पसंख्यांक विभाग, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागातील वसतिगृहांसाठी एक समान नविन टाईप प्लॅन तयार करण्याबाबत निर्देशित केले आहे. सदर निर्देशानुसार नविन टाईप प्लॅन तयार झाल्यानंतरच यावर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) येथील म.रा.औ.वि.महामंडळ (एम.आय.डी.सी.) च्या वाढीव जागेच्या प्रस्तावाला मंजुरी मिळणेबाबत

**(३) ८४८९ (०९-०४-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील म.रा.औ.वि.महामंडळ (एम.आय.डी.सी.) च्या वाढीव जागेच्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय, तसेच त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव बाबीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०७-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. अतिरिक्त खामगांव औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे. सुटाळा, ता.खामगाव, जि.बुलढाणा येथील २५४.४६ हे.आर. क्षेत्र अधिसूचित करण्यासंबधीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे. तथापि, केंद्र शासनाचा नविन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार भूसंपादन करण्यास तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे सदर कायद्यातून सूट देण्यासंबंधी केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिमायत बाग (जि.औरंगाबाद) येथे फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र व फळरोपवाटिका स्थापन करणेबाबत

**(४) १०९७९ (०४-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव दाभाडे येथे असलेल्या फलोत्पादन प्रशिक्षण केंद्रांच्या (एच.टी.सी.) च्या धरतीवर हिमायत बाग जि.औरंगाबाद येथे फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र व फळरोपवाटिका स्थापन करण्याबाबत मा.मंत्री कृषी व पणन व प्रधान सचिव, कृषी व पणन यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ ला पत्र दिले, व सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने कृ.प.म.-०९१३/प्र.क्र.१५०/२१-स. दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, कृषी पणन मंडळ पुणे यांना अभिप्राय देणेबाबत पत्र दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे प्रशिक्षण केंद्र व फळ रोपवाटिका केव्हा मंजूर होऊन सुरू होणार आहे वा कसे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-०६-२०१७) :**(१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास पत्र दिले हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम, १९६३ नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास, कोणतेही बोर्ड किंवा सोसायटी स्थापन करण्याचे अधिकार नसल्याचे विधी व न्याय विभागाने अन्य एका प्रकरणी अभिप्राय दिल्यामुळे तळेगांव दाभाडेच्या येथे असलेल्या फलोत्पादन प्रशिक्षण केंद्राच्या धर्तीवर अन्य कोणतेही प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास किंवा पणन विभागास स्थापन करता येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अन्यायग्रस्त जमातींना सवलती व संरक्षण देण्याबाबत

**(५) २१४४९ (०६-०८-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३३ अन्यायग्रस्त जमाती उदा महादेव कोळी, हलबा, कोष्टी, साळी देशकर, देवाग, काचेबंधे, गोवारी, माना, मन्नेवार, राजपुत, भामटा, ठाकुर, सुर्यवंशी, छत्री, धोबी, राज, ओतारी इत्यादी जमातींना सवलती व संरक्षणासंदर्भात लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी त्यांचे पत्र क्र.मुमंस/१४/७९९९७९ दिनांक २८ जानेवारी, २०१५ च्या अन्वये सचिव सामाजिक न्याय, प्रधान सचिव आदिवासी विकास व प्रधान सचिव सामान्य प्रशासन विभाग यांना या विषयी शासन मान्यतेने कार्यवाही करण्याबाबत सुचित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१७) :** (१) व (२) मा.लोकप्रतिनिधी यांच्या दि.०७.१२.२०१४ रोजीच्या निवेदनात नमुद केलेल्या जातींपैकी Halba, Halbi, KoliMahadev, Dhoba, GondGowari, Mana, Mannewar, Thakur, Raj, Mannervarlu, chattri या जमातींचा केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी घोषित केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश असून त्यांना अनुसूचित जमातीचे फायदे अनुज्ञेय आहेत. निवेदनातील उर्वरित जाती महाराष्ट्राच्या इतर विविध प्रवर्गात समाविष्ट असून सदर जाती/जमातींना महाराष्ट्र राज्यातील त्या-त्या प्रवर्गाचे लाभ अनुज्ञेय आहेत. शासनाने मा.राष्ट्रपती महोदयांच्या मंजूरीने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)अधिनियम २००० व त्याअंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ लागू केलेले आहेत.उक्त अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतूदीनूसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या पडताळणीचे काम करतात.

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्यापर्यंत सादर केलेले नाही, अशा कर्मचा-यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात येऊ नये अथवा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नये याबाबतचे सामान्य प्रशासन विभागाकडून शासन परिपत्रक दि.२१.१०.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर परिपत्रकास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र.६२४७/२०१५ (श्री. राजेंद्र दादोजी मरसकोल्हे व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन) प्रकरणी दि.२५.०४.२०१६ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिली आहे व सदयस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एमआयडीसीतील भूखंडांच्या किंमतीत केलेली दरवाढ

**(६) ४०३८० (२७-०४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक वसाहतीतील जागेच्या दरात ३० ते ३५ टक्के दरवाढ करण्याचा निर्णय ७ जानेवारी, २०१६ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व इतक्या मोठ्या प्रमाणावर दरवाढ करण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, विजेचे न परवडणारे दर, वाहतूकीची असुविधा औद्योगिक क्षेत्र मंदीचा सामना करत असून, एम आय डी सी ने भूखंडाच्या दरात वाढ केल्याने उद्योग उभारणीचे बजेटही वाढणार असल्याने गुंतवणूकदारांचे बजेट कोलमडणार असल्याने गुंतवणुकीला फटका बसणार आहे, हे खरे आहे काय.

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जागेचे दर कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(६) तसेच ग्रामीण व आदिवासी नक्षलग्रस्त भागात उद्योजक तेथे येऊन उद्योग सुरु करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे वा करणार आहे ?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७) :** (१), (२), व (३) लगतच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाचे दर सारखेच असणे आवश्यक असल्याने व भूखंड हस्तांतरण, मुदतवाढ, पोटभाडे इत्यादी मधूनच महामंडळास महसूल प्राप्त होत असल्याने तसेच, नवीन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादन करण्यात अडचणी असल्याने व महामंडळाचे दर हे शिघ्रसिध्द गणकाच्या तुलनेत कमी असल्याने महामंडळाच्या भूखंड वाटपाचे दरात वाढ होणे आवश्यक होते.याकरिता महामंडळाचे प्रचलित दर आणि शासनाच्या शिघ्रसिध्द गणकानुसारचे प्रचलित दर यातील तफावत कमी करण्याकरीता दरवर्षी १० टक्के दरवाढ करण्याची तरतुद आणि शिघ्रसिध्द गणकाचे दर विचारात घेऊन काही औद्योगिक क्षेत्रामधील दरामध्ये ३० टक्के पेक्षा जास्त वाढ करण्याचा तसेच काही औद्योगिक क्षेत्रांचे दर कमी करुन औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाचे प्रिमियम दरात सुधारणा करण्याबाबतचा ठराव संचालक मंडळाच्या दि. ३०.११.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये पारित करण्यात आला व त्या अनुषंगाने दि. ०७.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार भूखंड वाटपाचे प्रिमियम दरात सुधारणा करण्यात येऊन सुधारित दर दि. ०७.०१.२०१६ पासून लागू करण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) शासनाच्या उद्योग संचालनालयामार्फत पॅकेज स्किम ऑफ इन्सेंटीव्ह अंतर्गत विकसित/अविकसित विभागाचे वर्गीकरण करण्यात येते आणि त्यानुसार अविकसित विभागातील उद्योजकांना सवलती देण्यात येतात.

---

**राज्याच्या सामाजिक न्याय विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहांना भोजन पुरविण्याचे कंत्राट अनुसूचित जातीच्या संस्थेला देण्याबाबत**

**(७) ४०४०० (२८-०४-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहांना भोजन पुरविण्याची कंत्राटे ही अनुसूचित जातीच्या संस्था, महिला बचतगट व व्यक्तींना प्रथम प्राधान्याने देण्याचा शासन निर्णय २६ जुलै, २०११ रोजी काढण्यात आलेला असतानाही, सामाजिक न्याय विभाग भोजनाची कंत्राटे ही सर्वसाधारण कोट्यातील व्यक्तीना देते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या उपरोक्त कृतीमुळे मागासवर्गीय ठेकेदारांवर अन्याय होतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेल्या वसतीगृहांना भोजन पुरवठा करण्याचे कंत्राट मागासवर्गीय ठेकेदारास देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१७)** :(१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेल्या वसतिगृहांना भोजन पुरवठा करण्यासाठी ठेकेदाराची निवड करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**स्वतंत्र मातंग विकास खाते निर्माण करणेबाबत**

**(८) ४४७४७ (२८-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातीतील ५९ जाती पैकी मातंग समाज लोकसंख्येत दुसऱ्या स्थानावर असल्यामुळे या समाजासाठी आदिवाशींच्या धर्तीवर स्वतंत्र मातंग विकास खाते निर्माण करावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन मातंग समाजासाठी स्वतंत्र मातंग विकास खाते निर्माण करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) मातंग समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरिता या विभागामार्फत व स्वतंत्र अण्णाभाऊ साठे महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. त्यामुळे मातंग समाजातील व्यक्तींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये कोणताही अडथळा निर्माण होत नाही.

तसेच शासन आदेश दि.७/१/२०१७ अन्वये शासनाने मान्य केलेल्या क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी वेळोवेळी बैठका आयोजित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सफाई कामगारांची भरती करण्यासाठी काढण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये करण्यात आलेला जातीचा उल्लेख

**(९) ५३५३१ (२०-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाड-पागे समितीने सफाई कामगारांच्या नियुक्त्या वारसाहक्काने करण्याची केलेली शिफारस राज्य मंत्रीमंडळाने स्वीकारुन त्यानुषंगाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१५ रोजी काढलेल्या शासन निर्णयामध्ये मेहतर, वाल्मिकी, भंगी या जातीचा थेट उल्लेख करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयामध्ये करण्यात आलेला जातीचा उल्लेख हा घटनाबाह्य आणि विशिष्ट जातीचा अपमान करणारे असल्याने संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी मागासवर्गीय समाजाने केली असून, त्यांच्यावर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) अशा स्वरुपाची मागणी प्राप्त झालेली नाही तथापि, याप्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे.

(४) सदर चौकशीमध्ये संबंधित अधिकारी यांचेकडून अनावधानाने चूक झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना भविष्यात अशा प्रकारची चूक होणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत दि.२६.०५.२०१६ च्या शासन ज्ञापनान्वये सक्त ताकीद देण्यात आली आहे.

---

**जेष्ठ नागरीकांचे वय ६५ वर्षाहून ६० वर्षे करण्याबाबत**

**(१०) ५४१८० (२०-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेष्ठ नागरीकांचे वय ६५ वर्षाहून ६० वर्षे करण्यात येईल अशी घोषणा माहे डिसेंबर, २०१५ च्या नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशनाच्या कालावधीत सभागृहात समाजिक न्यायमंत्र्यानी केलेली असतानाही अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) जेष्ठ नागरीक धोरण माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये तत्कालीन आघाडी सरकारने जाहिर केलेले असतानाही आजमितीस ३० महिन्यांचा कालावधी उलटाला असतानाही या धोरणाचा आदेश न निघाल्यामुळे धोरणातील एकाही बाबींची अंमलबजावणी होवू शकलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही बाबींच्या अंमलबजावणीस विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) मा. सामाजिक न्यायमंत्र्यानी केलेल्या घोषणेची त्वरीत अंमलबजावणी तसेच जेष्ठनागरीक धोरणाच्या संदर्भातील विनाविलंब शासकीय आदेश काढून धोरणाप्रमाणे सर्व बाबींची तत्काळ अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१७) :** (१) आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) जेष्ठ नागरिकांचे वय ६५ वर्षावरुन ६० वर्षे करण्याबाबत वित्त विभाग व मंत्रिमंडळाच्या मान्यतेने कार्यवाही करण्यात येत आहे. जेष्ठ नागरिक धोरणाच्या अनुषंगाने नव्याने सर्वसमावेशक धोरण तयार करण्यासाठी अन्य राज्यातून माहिती मागितली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाटण विधानसभा मतदारसंघातील पाटण औद्योगिक क्षेत्राच्या विकासाबाबत**

**(११) ५४२१४ (२२-०८-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे पाटण तालुक्याच्या ठिकाणापासून १.५ कि.मी. अंतरावर पाटण औद्योगिक क्षेत्र असून याठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून केवळ एक ते दोनच उद्योग सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण ३४ भूखंड असून या भूखंडामध्ये सुमारे १५० नवीन उद्योग सुरु करण्यास वाव आहे. एकूण ३४ भूखंडापैकी २७ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. या २७ भूखंडापैकी केवळ २ भूखंडामध्ये उद्योग सुरु करण्यात आले असून वाटप केलेले २५ भूखंड व उर्वरीत राहिलेले ७ भूखंड आजमीतीला पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूखंड वाटप करुनही याठिकाणी उद्योग व्यवसाय सुरु नसल्याने इतर उद्योग करणा-या कंपन्यांना इच्छा असूनही याठिकाणी व्यवसाय किंवा उद्योग सुरु करता येत नसल्याने वापराविना पडून असलेले २५ भूखंड तात्काळ खाली करुन याठिकाणी नवीन उद्योजकांना सदरचे भूखंड वाटप करणेसंदर्भात राज्याचे उद्योग मंत्री यांनी निर्णय घ्यावा असे स्थानिक लोकप्रतिनीधीनी दि.०७-१०-२०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे उद्योग मंत्री यांचेकडे मागणी केली आहे.हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पाटण औद्योगिक क्षेत्रात वापराविना पडून असलेले २५ भूखंड तात्काळ खाली करुन याठिकाणी नवीन उद्योजकांना सदरचे भूखंड वाटप करणेसंदर्भात व पाटण औद्योगिक क्षेत्राचा विकास करणेकरीता राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही. तथापि पाटण लघु औद्योगिक क्षेत्रात एकूण ३४ भूखंडांचे आरेखन करण्यात आले असून त्यापैकी ३२ भूखंड औद्योगिक व २ भूखंड व्यापारी व सुविधा भूखंड आहेत. तसेच एकूण ३४ भूखंडांपैकी ३३ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यामध्ये ७ भूखंड उत्पादनात गेलेले, ३ भूखंड उत्पादनात जाऊन बंद पडलेले, ७ भूखंड ९० दिवसनंतर रिक्त भूखंडांच्या यादीत समाविष्ट केले जाणारे, विहित विकास कालावधी शिल्लक असलेले २, उद्योग संजीवनी अंतर्गत मुदतवाढ दिलेले २, मुदतवाढीची मागणी केलेले २, ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असलेले ५, पंचनामा करुन ताब्यात घेतलेले ५ व भूसंपादनाची नुकसान भरपाई न स्विकारलेला १ भूखंड यांचा समावेश आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) पाटण लघु औद्योगिक क्षेत्रातील एकूण ३४ भूखंडांपैकी नुकसान भरपाई न स्विकारलेला १ भूखंड वगळून उर्वरित ३३ भूखंडांचे वाटप केले असून त्यापैकी, ७ भूखंडांवर उत्पादन सुरु आहे व ३ भूखंडांवरील उत्पादन बंद झालेले आहे तर २ भूखंडांचा विकसित करण्याचा कालावधी शिल्लक आहे. उद्योग संजीवनी अंतर्गत २ भुखंडांना मुदतवाढ दिली आहे व २ भूखंडधारकांनी

मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे. अशाप्रकारे वाटप करण्यात आलेल्या ३३ भूखंडांपैकी १६ भूखंडांची सद्य:स्थिती आहे. उर्वरित १७ भूखंडांपैकी महामंडळाच्या धोरणानुसार व पंचनामा करुन १२ भूखंड महामंडळाने ताब्यात घेतले असून त्यांचे वाटप महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार करण्यात येत आहे तर,५ भूखंड परत ताब्यात घेण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे एमआयडीसीकडून स्थानिक ग्रामस्थ, रहिवाशांची आर्थिक पिळवणूक होत असलेबाबत**

**(१२) ५४३४८ (२२-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे (ता. खेड) एमआयडीसीने परिसरातील ग्रामस्थांना देण्यात येणाऱ्या पाण्याच्या दरात १३ पैसे घनलीटर वरून ८ रूपये घनलीटर इतकी वाढ केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दरवाढीबाबत स्थानिक ग्रामस्थ व रहिवाशांमध्ये तीव्र संताप पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही दरवाढ रद्द करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

लोटे औद्योगिक क्षेत्रानजिक प्रदुषण पिडीत ग्रामपंचायतीच्या पाण्याचा दर दि.१२/१/१९९८ रोजी १३ पैसे प्रती घनमीटर होता. त्यानंतर दि. ३१/१०/२००१, दि. ०१/०६/२००३ व दि. ०५/०२/२०१३ रोजी महामंडळाने टप्प्या टप्प्याने पाण्याच्या दरात वाढ केली आहे. तद्‌नंतर ५२/२०१३ पासून महामंडळाने सदर ग्रामपंचायतीस पाण्याचा दर रुपये ३.०० प्रती घनमिटर इतका सुधारित केला आहे.

(२) व (३) होय हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. ५११७ नुसार पुढील प्रमाणे मान्यता दिली आहे.

अ) महामंडळाने लोटे परशुराम क्षेत्राच्या पंचक्रोशीतील ११ प्रदुषणग्रस्त ग्रामपंचायतींना माहे ऑगस्ट २०११ अखेरीस थकीत पाणी बिलापोटीच्या एकूण रक्कमेपैकी दंडनीय आकार व विलंब आकार असे एकूण १२,४६,७४,६४७/- माफ करण्यात आली आहे.

ब) निव्वळ पाणी वापराची थकीत रु. ४,७६,९२,९२९/-रक्कमेपैकी ५०% रक्कम तातडीने भरण्याची आहे. त्यापैकी २५%लगेच भरणा करुन उर्वरीत २५% रक्कम पुढील ६ महिन्याच्या कालावधीत भरण्याची परवागनी देण्यात आली आहे.
क) या ग्राहकांसाठी पाणीपुरवठ्याचा जो दर निश्चित करेल त्या दराने सदर ग्रामपंचायतीना पाण्याच्या देयकाची रक्कम अदा करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.
वरीलप्रमाणे निर्णय ग्रामपंचायतीना कळविण्यात आला आहे. तथापि ग्रामपंचायतीकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारवी (जि. ठाणे) प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना पुनर्वसन, नोकरी व जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(१३) ५४७७१ (२४-०८-२०१६) श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारवी धरणग्रस्तांच्या (जि. ठाणे) वारसांना जमिनीचा मोबदला, पुनर्वसन व नोकरीची हमी देवूनही अद्यापपर्यंत कोणताही मोबदला प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रकल्पग्रस्तांनी मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर लवकरच न्याय देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बारवी प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन, जमिनीचा मोबदला तसेच नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१३-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रकल्पबाधीतांना प्रती हेक्टरी रु.१७,१८,७५०/- प्रमाणे नुकसान भरपाई रु.३१,५३,८६,२५०/- इतकी रक्कम वाटपास उपलब्ध करुन देण्यात आली होती. या रकमेपैकी शिल्लक रक्कम रु. ७,९५,६५,१४५/- खातेदार उपस्थित न राहिल्यामुळे वाटप करावयाची प्रलंबित आहे. तसेच बाधीत घरांच्या मुल्यांकनाचे वाटप ग्रामस्थांना सन २००९-२०१० मध्ये उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे मार्फत करण्यात आलेले आहे. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २०१३-१४ च्या दरसूचीप्रमाणे पुनर्मुल्यांकन केले असून रक्कम वाटपाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पग्रस्तांना निवासी भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. १०/०८/२०१६ तसेच मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/५/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली असून बारवी प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिका, नगरपरिषदा यामध्ये नोकरी देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने विशेष बाब म्हणून शासन निर्णय जारी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची व त्यामध्ये

बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना कुठल्याही प्रकारची परीक्षा व अटी न ठेवता त्यांच्या पात्रतेनुसार नोकरी उपलब्ध करुन देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यत आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्याच्या योजनेबाबत**

**(१४) ५५९८५ (२०-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आंतरजातीय विवाह केल्यास सरकारी नोकरीत प्राधान्य देण्याचे माईसाहेब आंबेडकरांच्या नावे योजना प्रस्तावित करण्याचे शासनाचे विचाराधीन असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्याची योजना आखली असून या योजनेसाठी म्हणून अर्ची/रिंकू राजगुरु हिला ब्रॅण्ड ॲम्बेसिडर बनविण्याचा विचार सामाजिक न्याय मंत्रालय करत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आंतरजातीय विवाह धोरणाचा मसुदा तयार करण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील नवीन योजना सुरु करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय घेतला व त्यानुसार त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) होय.
(४) आंतरजातीय विवाहाबाबत स्वतंत्र कायदा तयार करण्यासाठी मा.मंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात रमाई आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी हजारो घरे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१५) ५६००७ (२०-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रमाई आवास योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी घरे ग्रामीण भागात ८४,६५६ तर शहरी भागात २३,००९ इतकी अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रमाई आवास योजनेअंतर्गत लाभार्थींना देण्यात येणारी अपुर्ण असलेली घरे लवकरात लवकर पूर्ण करुन देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खटाव तालुक्यातील (जि.सातारा) खटाव, रहिमपूर व पाटण मुलींच्या शासकीय वसतिगृहाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१६) ५७१७१ (२०-०८-२०१६). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव तालुक्यातील (जि.सातारा) खटाव, रहिमपूर व पाटण येथील २००७ मध्ये मंजूरी मिळालेल्या मुलींच्या शासकीय वसतिगृहाचे काम अनेक कारणांनी अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहाचे काम अपूर्ण असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, वसतिगृहाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०७-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) खटाव जिल्हा सातारा येथील वसतीगृहाची जागा प्रत्यक्ष उपलब्ध करुन घेण्यास विलंब झाल्यामुळे सदर कामाच्या रु. ७.८७ कोटी इतक्या खर्चाच्या कामास शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि. ३१/३/२०१६ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

पाटण, जिल्हा सातारा येथील वसतीगृहासाठी जागा मिळण्यास विलंब झाल्यामुळे सदर कामाच्या रु. १०.३४ कोटी इतक्या खर्चाच्या सुधारीत दरसूची वरील कामास शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दि. २१/११/२०१६ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

---

**अहमदनगर औद्योगिक वसाहतीतील १६८ भूखंडांची मंजुरी न्यायालयाने रद्द केल्याबाबत**

**(१७) ६०८३३ (२२-०८-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आघाडी शासनामधील तत्कालीन उद्योगमंत्री यांनी अहमदनगर औद्योगिक वसाहतीतील (एमआयडीसी) (जि.अहमदनगर) १६८ भूखंडांचे करण्यात आलेले बेकायदा वाटपाचे आदेश मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.१४/०६/२०१५ रोजी वा त्या सुमारास रद्द करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने हे भूखंड पून्हा ताब्यात घेऊन लिलाव करावेत किंवा निविदा पध्दतीने त्याचे फेर वाटप करावे तसेच बेकायदा वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी, असे आदेश शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्र विकसीत करताना १० टक्के क्षेत्र "ओपनस्पेस" म्हणून व ५ टक्के क्षेत्र "सुविधांसाठी" राखीव ठेवण्याचे नियमानुसार बंधन असताना औद्योगिक विकास महामंडळाने या जागा उद्योजकांना वितरीत करताना एकाच व्यक्तिला अनेक भूखंड नियमानुसार अर्ज सादर न करताच तसेच भूखंडाचे वाटप महामंडळाच्या समिती समोर न आणता करण्यात आलेले वाटप तत्कालीन उद्योग मंत्री यांनी कायम केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार बेकायदा भूखंड वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांची व नियमाबाह्य तत्कालीन उद्योगमंत्र्यांनी बेकायदा वाटप केलेले भूखंड नियमित करण्याचे दिलेले आदेश, याप्रकरणी शासनस्तरावरुन चौकशी करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अहमदनगर औद्योगिक क्षेत्रातील म. औ. वि. महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार आवश्यक किमान मर्यादपेक्षा अतिरिक्त क्षेत्रातून भूखंड आरेखीत करुन प्रादेशिक अधिकारी यांच्या अधिकार कक्षेत नसताना वाटप केलेले आहे. सदर प्रादेशिक कार्यालयाकडून झालेली अनियमितता तत्कालीन मा. मंत्री (उद्योग) यांनी भूखंडधारकांकडून १० टक्के अतिरिक्त अधिमुल्याची वाढीव रक्कम आकारुन नियमाकुल करण्याबाबत निर्णय घेतला होता.

(३) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

**ग्रामोद्योग प्रशिक्षण संस्थांना सन २०१५-१६ पासून अर्थसंकल्पाची मंजुरीची प्रक्रिया बंद केल्याबाबत**

**(१८) ६१०९८ (२२-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या खादी आणि ग्रामोद्योग आयोग, मुंबईकडून ग्रामोद्योग प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण संस्थांना सन २०१५-१६ पासून अर्थसंकल्पाची मंजुरीची प्रक्रिया बंद करण्यात आली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे चंद्रपुर येथील ग्रामोद्योग संघ भद्रावतीद्वारास संचालित क्षेत्रीय कुंभार प्रशिक्षण केंद्र बंद पडण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रशिक्षण केंद्र निधी अभावी बंद पडू नये यासाठी केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद खादी व ग्रामोद्योग आयोग, नागपूर यांनी केलली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आंबी-नावाडी समाजास आरक्षण देण्याबाबत**

**(१९) ६१५८९ (२०-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आंबी-नावाडी समाजास आरक्षण देण्याबाबत राज्य मागासवर्ग आयोग पुणे यांचेकडून अहवाल क्र. ४९,५०,५१, शासनास प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने निर्णय घेवून समाजाला आरक्षण देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०१५ पासून वेळोवेळी मा. सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) याबाबत कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील, मागासवर्गीय वैद्यकीय पदव्यूत्तर व पदवीपूर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थाची शिष्यवृत्ती योजना बंद केल्याबाबत**

**(२०) ६५२२७ (२७-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील, मागासवर्गीय वैद्यकीय पदव्यूत्तर व पदवीपूर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थांना, सन १९४४ पासून सुरु असलेली, शिष्यवृत्ती योजना सन २०१० पासून, कोणताही शासन निर्णय जारी न करता, शासनाने अचानक बंद केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाने उक्त शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून, मिळणारी अनुदानाची रक्कम सन २०१० पासून, अचानक बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू योजनेची अनुदान रक्कम, केंद्र सरकारकडून राज्य शासनास प्राप्त होवूनही, राज्य शासनाने वैद्यकीय प्रशिक्षणार्थींना न देण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, यासंदर्भात दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी लोकप्रतिनिधींनी, शासनास दिलेल्या लेखी निवेदनानुसार, शासनाने उक्त शिष्यवृत्ती योजना तात्काळ सुरु करणेबाबत, अद्याप कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती बाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील शासनकीस वैधकीय महाविद्यालयातील मागासवर्गीय वैधकीय पदव्यूत्तर व पदवरपूर्व अनुसूचित जातीच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देय असून,केंद्र शासनाच्य दि.३१.१२.२०१० च्या मार्गदर्शक सूचनामधील अट क्र. ३ (१२) नुसार विद्यावेतन धारक वैधकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देय ठरत नाही.
(४)व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सहकारी पतसंस्थांना ५ लाखावरील गुंतवणूकीवर प्राप्तीकर लागू केल्याच्या नोटीसा बजावल्याबाबत

**(२१) ६५४७० (१७-१२-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या प्राप्तीकर विभागाने, काळ्या पैशावर नियंत्रण आणण्यासाठी, राज्यातील सहकारी पतसंस्थांना ५ लाखावरील गुंतवणूकीवर प्राप्तीकर लागू केल्याच्या, नोटीसा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बजावल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात एकूण किती नोंदणीकृत पतसंस्था आहेत, त्यापैकी किती संस्थांनी ५ लाखाच्यावर गुंतवणूक (ठेवी) घेतल्याचे, आढळून आले आहे,

(३) तसेच सदरहू गुंतवणूकदारांना, प्राप्तीकर लागू करण्याबाबत, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात ठेवी स्वरुपात, गुंतवणूक करण्यात येत असलेल्या, करोडो रुपयाचे काळे धन नियंत्रणात आणून व त्यावर प्राप्तीकर लावून, दंड आकारणेबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०७-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) राज्यात एकूण १३,५२२ नोंदणीकृत ग्रामीण बिगरशेती / नागरी पतसंस्था आहेत. त्यापैकी ५२२ पतसंस्थांनी रु. ५ लाखांच्यावर गुंतवणूक (ठेवी) ठेवलेल्या आहेत. उपरोक्त ५२२ पतसंस्थांपैकी ४० पतसंस्थांना आयकर विभागाने नोटीसा पाठविल्या असून त्यापैकी १४ पतसंस्थांनी त्याबाबतचा खुलासा आयकर विभागास सादर केलेला आहे.

(३) व (४) गुंतवणूकदारांना प्राप्तीकर लागू करणे, त्यांना दंड आकारणे याबाबतचे सर्व अधिकार केंद्रीय प्राप्तीकर विभागासच आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ऐरोली (जि.ठाणे) येथील एमआयडीसीच्या जागेत अनधिकृत तबेले असल्याबाबत

**(२२) ६६१०८ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (जि.ठाणे) येथील यादवनगरमध्ये प्रकल्पग्रस्तांनी एमआयडीसीला उद्योग उभारणीसाठी दिलेल्या जमिनीवर उत्तर प्रदेश व बिहारमधून आलेल्या परप्रांतीयांनी अनधिकृतपणे झोपड्या व जनावरांचे तबेले बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐरोली विभागात सुमारे २८ अनधिकृत जनावरांचे तबेले असून यादव नगरात सुमारे २० तबेल्यांमध्ये अंदाजे ७०० ते ८०० जनावरे पाळण्यात आली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वच्छतेचे कोणतेही निकष पाळले जात नसल्याने या तबेल्यांमुळे परिसरातील सुमारे १० हजारांपेक्षा अधिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अनधिकृत तबेले हटविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७) :** (१), (२) व (३) ऐरोली येथील यादवनगरमध्ये एकूण २९ तबेलेपैकी ९ तबेले व काही झोपडपट्टी महामंडळाच्या संपादित क्षेत्रावर अनधिकृतपणे बांधलेले असून तबेल्यामुळे परिसरातील आरोग्यास व पर्यावरणास धोका असल्याची शक्यता नाकारता येत नाही.
(४) व (५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत दि.२१/१/२०१६ पर्यंत ५०० झोपड्या व ३ तबेल्यांचे निष्कासन केले आहे. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रालागून असलेले खाजगी व वन क्षेत्राबाबत सिमांकन करण्यात येत असून महामंडळाच्या क्षेत्रामध्ये केलेल्या अतिक्रमीत झोपडयांचे शासनाच्या झोपडपट्टी पुर्नवसन योजनेच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामधील अतिक्रमण निष्कासन करण्याकरीता स्वतंत्र अतिक्रमण निष्कासन दल निर्माण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत पालिका कार्यक्षेत्रामधील अनधिकृत तबेल्यावर कारवाई करण्यासाठी पालिका पशुवैद्यकीय अधिकारी यांची परवाना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याबाबत सुधारणा करण्यात येत आहे.

---

### बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या दलित ऐक्य मूक मोर्चाबाबत

**(२३) ६६२०५ (१०-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर दलित ऐक्य मूक मोर्चा काढून त्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक १५ऑक्टोबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, सदरहू निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत;
(३) असल्यास, सदरहू मागण्यांच्या पूर्ततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२५-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनात पुढीलप्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत :-
१) कोपर्डी, जातेगाव, नाशिक, धुळे व बीड येथील गुन्हयातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी.

२) ॲट्रॉसिटी कायद्यात बदल न करता त्याची कडक अंमलबजावणी करावी.

३) ॲट्रॉसिटी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त केलेली समिती बरखास्त करावी.

४) ॲट्रॉसिटी कायदा भटक्या विमुक्तांना लागू करावा.

५) शेतीचे व शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे.

६) अनुसूचित जाती, जमाती व भटके विमुक्त कसत असलेल्या गायरान जमिनी त्यांच्या नावे करण्यात यावे.

७) भारत सरकारच्या शिष्यवृत्तीत महागाई निर्देशानुसार वाढ करणे व त्याचे वाटप प्रत्येक महिन्याला करणे.

८) भारतीय संविधानाने दिलेल्या नोक-यातील आरक्षणाला संपवणारी ठेकेदारी पध्दत रद्द करुन राखीव जागेचा अनुशेष त्वरित भरणे.

९) नाशिक येथील ग्रामीण भागातील दलितांवर हल्ला करणा-या गुंडांना त्वरित अटक करणे.

१०) महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, संत रोहीदास चर्मकार विकास महामंडळ, वसंतराव नाईक भटके विमुक्त विकास महामंडळ, आदिवासी विकास महामंडळ यांना आर्थिक तरतूद करुन कर्ज वाटप सुरु करणे.

(३) कोपर्डी, जातेगाव, नाशिक, धुळे व बीड येथील गुन्हयातील आरोपींना शिक्षा देण्याची बाब न्यायालयीन असून ॲट्रॉसिटी कायदा केंद्र शासनाचा आहे. उक्त निवेदनातील मागण्या संबंधित विभागांकडे कार्यवाहीकरिता पाठविण्यात आल्या असून सदर मागण्यांवर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भटक्या - विमुक्त समाजातील राजेफासेपारधी जातीचे लोकांना जातीचे दाखले देण्यात येण्याबाबत**

**(२४) ६७२०३ (१०-०१-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या - विमुक्त समाजातील राजेफासेपारधी लोकांना जातीचे दाखले देण्यात येण्याबाबतची मागणी अंबरनाथ येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.१४ सप्टेंबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.सामाजिक न्याय मंत्र्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्याच्या मागासवर्गीयांच्या यादीमध्ये ज्या जातींचा समावेश आहे, केवळ त्याच जाती समाजाच्या लोकांना मागासवर्गीयांचे जातप्रमाणपत्र देण्यात येते. केंद्र शासनाच्या

निर्देशानुसार या विभागाच्या दि.६/२/२०१० च्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, दि.२१/११/१९६१ रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवास असण्याची अट विहित करण्यात आली असून त्यानुसार जातपडताळणी नियम २०१२ मध्ये सदर अटीचा समावेश करण्यात आला आहे. जातपडताळणी नियम-२०१२ नुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मोहा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे बेकायदा सावकारी व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(२५) ६८४०३ (१७-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोहा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे बेकायदा सावकारी व्यवसाय सुरु असून सावकाराच्या त्रासामुळे अनेक दारिद्र्य रेषेखालील लोकांनी आत्महत्या केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बेकायदा सावकारी व्यवसाय करणाऱ्या सावकारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

एका (सुनील अशोक मुटकुळे) व्यक्तीने सावकाराच्या त्रासामुळे आत्महत्या केली आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी अवैध सावकारी आढळून आल्यामुळे श्री. दत्तात्रय चंदर मडके या सावकारांविरूध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम ३९ अन्वये पोलीस स्टेशन, कळंब येथे दि. १३.०८.२०१६ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना घरकुले बांधून देण्यासाठी रमाई आवास योजनेअंतर्गत दिलेले पैसे अखर्चित राहील्याबाबत**

**(२६) ७०६१८ (१०-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वतीने परभणी जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना घरकुले बांधून देण्यासाठी रमाई आवास योजना सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील शहरी भागात या योजनेंतर्गत २००९ ते २०१६ या कालावधीत १३ कोटी १८ रुपये निधी मिळाला होता त्यापैकी ३ कोटी ७७ लाख ५६ हजार रुपयांचा निधी अद्यापही अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१७) :** (१) होय.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) नागरी क्षेत्रांतर्गत घरकुल मंजुर केलेल्या रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही. काही लाभार्थी वास्तव्यास बाहेर गावी गेलेले आहेत. तसेच काही लाभार्थी मयत झाले असल्या कारणाने आणि काही लाभार्थ्यांच्या जागेची नोंद नगर पालिकेमध्ये केली नसल्या कारणाने लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर निधी अखर्चीत राहिला आहे.

---

**सांगली जिल्ह्यातील अवसायानात गेलेल्या वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२७) ७१३३० (१७-१२-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील अवसायानात गेलेल्या वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेतील २४७ कोटी ७५ लाख ५४ हजार रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा पहिल्या सप्तहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त बँकेने ४०,००० ठेवीदार व खातेदारांना त्यांच्या ठेवी व खात्यातील रक्कम अद्यापपर्यंत परतफेड केली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा तिसऱ्या सप्ताहात वा निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि संबंधित ठेवीदार व खातेदारांना त्यांच्या ठेवीच्या रकमा परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(५) तसेच या गैरव्यवहाराला जबाबदार असलेल्या पदाधिकाऱ्यांची नावे काय आहेत व संबंधितांविरुध्द कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०७-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी सुरु आहे.
(४) व (५) बँकेच्या अवसायन कालावधीमध्ये एकूण १,४२,७८९ ठेवीदारांपैकी ५७,३४६ ठेवीदारांना रु. १५२.४० कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी परत करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ व त्याखालील नियम, १९६१ मधील कलम ७२(३) अन्वये बँकेचे आजी / माजी संचालक (मयत संचालकांचे वारसदार) यांच्यावर दिनांक ९.८.२०१६ रोजी आरोपपत्र बजावण्यात आले असून चौकशी अधिकारी यांनी दिनांक ११.१.२०१७ रोजी अधिनियमाचे कलम ९५ अन्वये संबंधीत संचालकांच्या व मयत संचालकांच्या वारसांच्या मालमत्तांवर जप्ती आदेश निर्गमीत केले आहेत.

या आदेशाविरुद्ध संबंधीतांनी सहकार अपील न्यायालयात अपील दाखल केले असून अपील न्यायालयाने सदर जप्ती आदेश त्यांच्या दिनांक २.३.२०१७ रोजीच्या आदेशान्वये रद्द केले असून बँकेने पुन्हा अधिनियमाच्या कलम ९५ अन्वये अर्ज केल्यास गुणवत्तेवर व कायदेशार तरतूदीनुसार निर्णय घेण्याची अनुमती दिली आहे. त्यानुसार बँकेने प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांकडे दिनांक ३.३.२०१७ रोजी अर्ज दाखल केला असून दिनांक ९.३.२०१७ ते दिनांक ७.६.२०१७ या दरम्यान संबंधितांच्या सुनावण्या घेऊन प्रकरण आदेशार्थ बंद करण्यात आले आहे.

गैरव्यवहारास जबाबदार असणारे संबंधीत पदाधिकारी (मयत पदाधिकाऱ्यांचे वारस) यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १) श्रीमती जयश्री मदन पाटील वगैरे ३ | २) शशिकांत कलगोंडा पाटील |
| ३) नरसगोंडा सातगोंडा पाटील | ४) सुरेश आदगोंडा पाटील |
| ५) अमरनाथ सदाशिव पाटील | ६) किरण राजाभाऊ जगदाळे |
| ७) माधवराव ज्ञानदेव पाटील | ८) तुकाराम रामचंद्र पाटील |
| ९) सुरेश देवाप्पा आवटी | १०) प्रमिलादेवी प्रकाशराव माने |
| ११) सुभाष गणपती कांबळे | १२) दादासो वाघु कांबळे |
| १३) निवृत्तीराव मारुती पाटील | १४) श्रीमती प्रेमा सतिश बिरनाळे वगैरे ४ पैकी |
| अ) सौ. निता अभय बगाटे | आ) सौ. गिता प्रविण पाटील |
| १५) जंबु दादा थोटे | १६) भरत महादेव पाटील |
| १७) बेबीताई मारुती पाटील | १८) निवास दत्ताजीराव देशमुख |
| १९) दत्तात्रय श्रीपती सुर्यवंशी | २०) सुधाकर धोंडीराम आरते |
| २१) गजानन लक्ष्मणराव गवळी | २२)सर्जेराव सखाराम पाटील |

| | |
|---|---|
| २३) सुरेश जिनगोंडा पाटील | २४) अरविंद शामराव पाटील |
| २५) श्रीपाल नेमगोंडा बिरनाळे | २६)आनंदराव मारुती पाटील |
| २७) भूपाल दत्तात्रय चव्हाण | २८) प्रकाश बाबुराव साठे |

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले यांची १२५ वी पुण्यतिथी आणि शतकोत्तर रौप्य स्मृती कार्यक्रम आखण्याबाबत**

**(२८) ७१९३४ (१०-०१-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागस प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थोर समाजसुधारक महात्मा फुले यांची १२५ वी पुण्यतिथी आणि त्यांच्या शतकोत्तर रौप्य स्मृती वर्षाकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याची तक्रार करुन वर्षभरासाठी कार्यक्रम आखण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी तसेच माहे ऑगस्ट, २०१६ व ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०७-२०१७) :** (१) होय.

(२) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी ऐवजी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण या नवीन विभागामार्फत त्यांची जयंती राज्यात उत्साहात साजरी करून सदर दिवशी विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १० एप्रिल,२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पंचातारांकित एम.आय.डी.सी. मध्ये अनेक औद्योगिक भूखंड उद्योग उभारणीविना पडून असल्याबाबत**

**(२९) ७३०७७ (१६-१२-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पंचातारांकित एम.आय.डी.सी. मध्ये कित्येक औद्योगिक भूखंड उद्योग उभारणीविना पडून असल्याने क्षमता असूनही नवीन उद्योजकांना अडचण निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कागल पंचातारांकित एम.आय.डी.सी. मध्ये १० वर्षाहून अधिक कालावधी होवूनही अद्याप उद्योग उभे न केलेले भूखंड उपलब्ध आहेत,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,भूखंडांना उद्योग उभारणीत मुदतवाढ देण्यात येते काय,
(४) असल्यास,कागल पंचातारांकित एम.आय.डी.सी. मधील २६३ क्रमांकाच्या भूखंडाची सद्य:स्थिती काय आहे,
(५) तसेच याप्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली ?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७) :**(१) व (२) पंचतारांकित एम.आय.डी.सी. मध्ये काही भूखंड वापराविना आहेत.
(३) होय,

भूखंडधारकानी भूखंड विकास कालावधीमध्ये भूखंड विकासाकरीता घेतलेल्या परिणामकारक बाबी (Effective Steps) विचारात घेता प्रचलित धोरणानुसार मुदतवाढीचे शुल्क आकारुन मुदतवाढ देण्यात येते.
(४) भूखंड क्रं ए-२६३, क्षेत्र २१५३१ चौ.मी. चे वाटप श्री.राहुल अशोक दुधाणे भागीदार मे.दुधाणे मेटॉलिक्स यांना दि.१५/०१/२००७ रोजी करण्यात आले आहे. सदर भूखंडावर ४३५७.५०चौ.मी इतके बांधकाम केलेले असून बीसीसी दि.०६/०६/२०१६ रोजी घेतलेली आहे. सदर भूखंडधारक माहे ऑगस्ट, २०१५ पासून उत्पादनात गेलेला आहे.
(५) ज्या भूखंडांचा विहित व वाढीव कालावधी दि.३१/०८/२०१३ पूर्वी संपुष्टात आलेला आहे, अशा भूखंडधारकांना शेवटची संधी म्हणून दि.३१/०८/२०१७ पर्यंत बीसीसी प्राप्त करण्यासाठी उद्योग संजिवनी योजना जाहीर करण्यात आली आहे. तसेच ज्या भूखंडधारकानी अद्यापी भूखंड विकासाकरीता कोणतीही कार्यवाही केली नाही अशा उद्योजकांना महामंडळाच्या धोरणानुसार नोटीस बजावून भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येते.

---

## राहुरी तालुक्यातील (जि.अहमदनगर) येथील शेतकऱ्याने फायनान्स कंपनी व सावकाराच्या त्रासामुळे केलेली आत्महत्या

**(३०) ७६०३३ (०६-०५-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगाव फुगगी (ता.राहूरी,जि.अहमदनगर) येथील तरुण शेतकऱ्याने खाजगी सावकार व फायनान्स कंपन्यांनी केलेल्या मारहाणी व त्रासाला कंटाळून दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत्यूपूर्व लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये खाजगी सावकार व फायनान्स कंपनीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधित सावकार व फायनान्स कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच असे प्रकार परत उद्भवू नये यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) पिंपळगाव फुणगी येथील नारायण शिवाजी माने यांनी दि.१४.०१.२०१७ रोजी आत्महत्या केली. सदर आत्महत्येच्या अनुषंगाने तहसिलदार, राहुरी यांनी केलेल्या चौकशीनुसार सदरची आत्महत्या ही ट्रक खरेदी विक्रीच्या राहिलेल्या पैश्यावरून घडल्याचे तपासात निदर्शनास आले आहे. तसेच सदर प्रकरणी पोलिस स्टेशन, राहुरी येथे गुन्हा दाखल झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केगाव (ता. उरण, जि. रायगड) गावाला रानसई धरणातून जादाची पाईपलाईन टाकून पाणी पुरवठा होण्याबाबत**

**(३१) ७७०१९ (२४-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केगाव (ता. उरण, जि. रायगड) या गावाला रानसई धरणातून अधिकची पाईपलाईन टाकून तसेच पोसरी ग्रामपंचायत (ता.पनवेल) या गावाला नविन पाईप लाईन टाकून पाणी पुरवठा होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. उद्योग मंत्री यांना दिनांक २० नोव्हेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देसाई (१५-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केगांव गावाला अधिकची पाईप लाईन टाकणे :
केगांव ग्रामपंचायतीस (ता.उरण) या गावाचा म.औ.वि. महामंडळातर्फे पाणी कोटा ७० घनमीटर/दिन मंजूर असला तरी महामंडळातर्फे सध्या १८० घनमीटर/दिन पाणीपुरवठा करण्यात येत आहे. माहे एप्रिल २०१७ पर्यंत केगांव ग्रामपंचायतीकडे एकूण थकबाकी १,१३,६०,२१६/- इतकी असून यापैकी निव्वळ पाणी पट्टी रु. १३,७०,८१७/- आहे. केगांव ग्रामपंचायतीने वाढीव नळ जोडणी मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर दि.०५/०४/२०१६ व २६/०७/२०१६ रोजी बैठक घेऊन थकबाकी पोटी ५०% रक्कम ग्रामपंचायतीने अदा केल्यानंतर वाढीव पाणी पुरवठ्याबाबत विचार करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि,

ग्रामपंचायतीने अद्याप थकबाकीपोटी रक्कम भरणा केलेली नसल्याने व पाण्याचे देयक वेळोवेळी भरत नसल्यामुळे वाढीव नळ जोडणी देण्याची कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.
पोसरी (जुनी) गावाला नविन पाईप लाईन टाकणे :-
पनवेल तालुक्यातील पोसरी गावाला एचओसी कंपनीच्या पाईपलाईन मधून म.औ.वि.महामंडळाच्या परवानगीने एचओसी कंपनी ५० मि.मी. व्यासाच्या नळजोडणीतून प्रती दिन ११५ घनमीटर पाणीपुरवठा करत आहेत. सध्या एचओसी कंपनी या गावाचे पाणी देयक अदा करीत आहे. सदर गाव पाताळगंगा पाणीपुरवठा केंद्रापासून ५ किमी अंतरावर व उंचावर असल्याने पाणीपुरवठा वाढविण्यासाठी नळजोडणी ठिकाणी किंवा सखल ठिकाणी टाकी बांधून उदंचन संचाव्दारे पाणी उचलणे आवश्यक आहे. एचओसी कंपनीला पाणीपुरवठा करणा-या जलवाहिनी व्यतीरिक्त स्वतंत्र पाईप लाईन नसल्यामुळे म.औ.वि. महामंडळास या गावाला पाणीपुरवठ्याकरीता स्वतंत्र नळजोडणी देणे शक्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहकार मित्र चंद्रकांत बढे सर अर्बन को-ऑप सोसायटी लि. वरणगाव, जि. जळगाव,शाखा सातपुर, नाशिक या सोसायटीने नागरीकांची फसवणुकी केलेबाबत**

**(३२) ७७२२९ (२१-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहकार मित्र चंद्रकांत बढे सर अर्बन को-ऑप सोसायटी लि. वरणगाव, जि. जळगाव या सोसायटीने सातपुर, नाशिक येथे शाखा स्थापित करुन नागकरीकांकडून मोठ्या प्रमाणात ठेवी जमा केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरहू सोसायटी ही सन २००७ पासून बंद असून नागरीकांच्या ठेवी सोसोयटीने दिल्या नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सोसायटीच्या विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,
(४) तसेच नागरीकांच्या ठेवी परत मिळण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०७-२०१७) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
सदर सोसायटीची जुन, २००० मध्ये सातपूर येथे शाखा सुरु करण्यात आली होती. मात्र सदर सोसायटी सन २००७ मध्ये अडचणीत आल्याने सहकार आयुक्त यांच्या दिनांक २६.६.२०१२ रोजीच्या आदेशान्वये सोसायटीच्या सातपूर येथील शाखेचे नाशिक सिडको येथील शाखेत विलिनीकरण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या शाखेतून संस्थेचे कामकाज सुरु आहे. तसेच संस्थेने नागरिकांची फसवणूक केली असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे.

(३), (४) व (५) सदर सोसायटी अडचणीत आल्याने सहकार आयुक्त कार्यालयाने त्यांच्या दिनांक २.८.२००८ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशीचे आदेश दिले आहेत. सदर चौकशीच्या अनुषंगाने सोसायटीच्या तत्कालीन २४ संचालकांवर रु. १६२.७० कोटी इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी रु. ३.२२ कोटी इतक्या रक्कमेची वसूली करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सोसायटीच्या तत्कालीन संचालकांनी विनातारण कर्जवाटप मोठ्या प्रमाणावर केल्याने त्यांचेवर वरणगाव पोलिस स्टेशन येथे रु. १०१ कोटीचा व सांगवी, पुणे येथे रु. २१.५९ लाख इतक्या रक्कमेचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच विनातारण कर्ज घेतलेल्या २११ कर्जदारांपैकी ११० कर्जदारांवरदेखील गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सहकार आयुक्त यांच्या दिनांक २५.४.२०१४ रोजीच्या आदेशान्वये सदर सोसायटी अंतीम अवसायनात काढण्यात आली असून सद्यस्थितीत संस्थेवर अवसायक मंडळाची नेमणूक करण्यात आली आहे.

---

**सोयाबीन विक्रीवर प्रती क्विंटल दोनशे रुपये प्रमाणे अनुदान थेट शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत**

**(३३) ७७५२२ (१४-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सोयाबीन विक्रीवर दोनशे रुपये क्विंटल अनुदान देण्याचा निर्णय घेतला परंतु आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेने शेतकरी त्रस्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोनशे रुपयांच्या अनुदानासाठी विचारणा करतांना शेतक-यांना चारशे ते पाचशे रुपयांचा भुर्दंड बसू लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संचिकांचा प्रकार थांबवून सोयाबीनवरील अनुदान थेट शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शासन निर्णय, दिनांक १५/०१/२०१७ नुसार पात्र लाभार्थ्यांची संख्या व त्यासाठी लागणारे एकूण अनुदान याबाबत पणन संचालक,पुणे यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात संजय गांधी निराधार योजनेची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव**

**(३४) ७८१९५ (०६-०५-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यासाठी उत्पन्नाची वार्षिक मर्यादा २१,०००/- असल्याने अनेक निराधार व गरीब जनतेला या योजनेचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंची उत्पन्नाची मर्यादा किमान ५०,००० पर्यंत करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१७) :** (१), (२), (३) व (४) विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत योजनाचा लाभ देण्यासंदर्भात लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत रु.२१,०००/- वरून रू. ४०,०००/- एवढी वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे

---

**राळेगाव (जि. यवतमाळ) येथे एम. आय. डी. सी. ची निर्मीती नसल्याबाबत**

**(३५) ७८४५५ (२१-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुका स्तरावर औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत एम. आय.डी.सी. ची निर्मीती करण्याचे धोरण असताना यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या तालुक्यामध्ये एम.आय.डी.सी. ची निर्मीती अद्यापर्यंत झाली नसल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा च्या सुमारास असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेरोजगाराना रोजगारासाठी इतर जिल्ह्यात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,बेरोजगारांना स्थानिक स्थरावर रोजगार उपलब्ध होण्यासाठी या परिसरातील सोयाबीन, तुर, कापुस या पिकांचे मोठया प्रमाणात उत्पादन होत असल्याने या पिकांवर आधारीत उद्योग सुरु करण्यासाठी राळेगाव मध्ये एम. आय. डी. सी. ची निर्मीती करण्यात येईल काय,

(४) असल्यास, कधीपर्यंत निर्मीती करण्यात येईल.

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयामध्ये यवतमाळ, अतिरिक्त यवतमाळ अशी दोन मोठी औद्योगिक क्षेत्रे तसेच वणी, कळंब, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड व महागाव येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आलेली असून तेथे बऱ्याच प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात कांद्याच्या बाजारभावात झालेल्या घसरणीबाबत**

**(३६) ७८४७५ (०६-०५-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील बाजार समित्यांमध्ये काद्यांची मोठ्या प्रमाणावर आवक होत असून अत्यंत कमी भाव मिळत असल्याने व हमी भाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक अडचणीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांनी रास्ता रोको आंदोलन करुन कांद्यास हमीभाव जाहीर करावा व शेतक-यांना विक्री केलेल्या कांद्यावर अनुदान उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कांदा उत्पादकांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०७-२०१७) :** (१) हंगाम २०१६-१७ मध्ये कांदा उत्पादनात झालेल्या वाढीच्या पार्श्वभुमीवर पुरवठ्याच्या प्रमाणात मागणी कमी असल्याने, बाजारातील आवक वाढल्याने कांद्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी भाव मिळाला आहे.हे खरे आहे. मात्र कांदा नाशवंत शेतमाल असल्याने,कांद्याला हमी भाव घोषित केला जात नाही. त्यामुळे कांद्याला हमी मिळत नाही.हे खरे नाही.
(२) होय.
(३) राज्यातील ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जुलै, २०१६ व ऑगस्ट,२०१६ मध्ये कृषि उत्पन्न बाजार समितीत विक्री केलेल्या कांद्यासाठी प्रति क्विंटल रुपये ५००/- व प्रति शेतकरी २०० क्विंटलप्रमाणे अनुदान वितरीत करण्यासाठी रुपये ४३.४४ कोटी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

तसेच कांद्याला योग्य दर मिळावा यासाठी अन्य राज्यात कांदा पाठविण्यासाठी जादाच्या रेल्वे वॅगन व रॅक्स उपलब्ध करुन दिल्या आहेत.

त्याचबरोबर केंद्रशासनास वेळोवेळी विनंती करुन भारत व्यापारी माल निर्यात योजना(Merchandise Exports from India Scheme) योजनेचा कालावधी वाढवून घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरी (जि. गोंदिया) येथील एम.आय.डी.सी.मध्ये नवीन उद्योगधंदे सुरू करण्याबाबत**

**(३७) ७९०९१ (२१-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक धोरणाला चालना देण्याबरोबरच देवरी (जि.गोंदिया) येथील एम.आय.डी.सी.येथे नवीन उद्योगधंदे सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मे,२०१६ रोजी वा त्यासुमारास राज्याचे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुषंगाने नवीन उद्योगधंदे सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (१३-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) देवरी विकास केंद्रामध्ये मोकळ्या असलेल्या व विकास कालावधी संपलेल्या अशा ११ भूखंडापैकी ८ भूखंडाचे वाटप रद्द करण्यात आले असून, आता नविन भूखंडांसाठीची मागणी वाढलेली आहे. सद्य:स्थितीत नवीन उद्योजकांनी मागणी केलेल्या १३ उद्योजकांना भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे. या क्षेत्रामध्ये नजीकच्या काळात नव्याने वाटप केलेले एकूण ४९ भूखंडाचा समावेश आहे. या प्रस्तावित उद्योगामध्ये त्यांची एकुण गुतंवणुक रु.९४०.५४ लक्ष रक्कमेची असून १२१९ लोकांना रोजगार उपलब्ध होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरी (जि. गोंदिया) तालुक्यातील सावकारांनी सुमारे ५००० शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत**

**(३८) ७९०९४ (२१-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरी (जि. गोंदिया) तालुक्यातील सावकारांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ पूर्वी सुमारे ५००० शेतक-यांची फसवणूक करून सोने गहाण ठेवून कर्ज दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी सोने गहाण ठेवून शेतकऱ्यांच्या फसवणुकीबाबत शासनाकडे किती प्रस्ताव दाखल झाले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करून गहाण ठेवलेले सोने शेतकऱ्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच दोषी आढळलेल्या सावकारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.
देवरी (जि. गोंदिया) तालुक्यातील सावकारांनी शेतक-यांची फसवणूक करून सोने गहाण ठेवून कर्ज दिल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) सोने गहाण ठेऊन शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबतची कोणतीही तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव व धुळे जिल्हयात आयटी हब सुरु करण्याबाबत

**(३९) ७९१८९ (२०-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव व धुळे जिल्हयात आयटीशी संबधित अभ्यासक्रम चालविणारी महाविद्यालये असून या जिल्हयात आयटी हब नसल्याने येथील तरुणांना नोकरीकरिता पुणे - मुंबई येथे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खान्देशात आयटी हब सुरु करण्याकरिता शासन काही प्रयत्न करणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्र शासनाने "महिती तंत्रज्ञान व तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ " हे दिनांक २५/८/२०१५ रोजी जाहिर केले आहे. सदर धोरणामध्ये अतिरिक्त चटाईक्षेत्र, मुद्रांक शुल्कात सूट, विद्युत शुल्कांत सूट इ. आर्थिक व अर्थिकेतर सवलतीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. सदर धोरणाअंतर्गत उद्योजकांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## सांगली जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात खासगी सावकारी सुरु असलेबाबत

**(४०) ७९२४१ (२१-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात खासगी सावकारी सुरु असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील अनेक सावकारांच्याकडून सर्वसामान्याना धमकावणे, मारहाण करणे, त्यांच्या जमिनी व घरे स्वत:च्या नावांवर करणे असे प्रकार करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यामध्ये किती अधिकृत परवानाधारक सावकार आहेत,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणांची चौकशी करुन संबंधीत दोषी सावकारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
सांगली जिल्ह्यात खासगी सावकारी बाबतच्या ४ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.
(२) सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील १, शिराळा तालुक्यातील ३ व मिरज तालुक्यामध्ये वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या आधारे अशा एकूण ५ प्रकरणी गोपणीय चौकशी केली असता सदर प्रकरणी बेकायदेशीर सावकारी झाल्याचे आढळून आलेले नाही.
तथापि महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम,२०१४ राज्यात लागू झाल्यापासून सांगली जिल्ह्यामध्ये सावकारीच्या ओघात मिळविलेल्या शेतजमिनीबाबत ११ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८ अंतर्गत २ प्रकरणामध्ये मालमत्ता परत करण्याचे आदेश दिले आहेत.
(३) सांगली जिल्ह्यामध्ये ३१ मार्च २०१७ अखेर परवानाधारक सावकारांची संख्या ६२१ इतकी आहे.
(४) सदर प्रकरणी चौकशीअंती बेकायदेशीर सावकारी आढळून आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा समाजकल्याण जातपडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्राकरिता दाखल ६५५६ उमेदवारांच्या पडताळणी प्रस्तावापैकी ४३८३ प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ७९३८६ (२१-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा समाजकल्याण जातपडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्राकरिता दाखल ६५५६ उमेदवारांच्या जात पडताळणी प्रस्तावापैकी फक्त २१७३ प्रकरणांची पडताळणी झाली असून ४३८३ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ४३८३ एवढ्या प्रचंड प्रमाणात प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,नाशिक जिल्हयात निवडणूकीतील उमेदवार व विद्यार्थ्यांना जात पडताळणी तातडीने हवी असल्याने व प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) उअसल्यास, प्रलंबित प्रकरणी तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
मे २०१७ अखेर फक्त ३५८ प्रकरणे त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत.
(४) जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणात त्रुटी असल्यास समितीकडून संबंधित अर्जदारास त्रुटी पूर्तता करणेबाबत पत्राद्वारे कळविले जाते व अर्जदाराने योग्य त्रुटीपूर्तता केली असल्यास सदर नस्तीवर तात्काळ निर्णय घेण्यात येत असतो. तसेच प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी संबंधित समितीच्या वतीने नियमितपणे विशेष त्रुटीपूर्तता शिबीराचे आयोजन केले जाते व या शिबिराबाबत वृत्तपत्रातून प्रसिद्धी देखील दिली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद इंडस्ट्रीयल सिटीतील (ऑरिक) येथे शेतक-यांकडून एकरी २३ लाख रुपये दराने खरेदी केलेल्या जमिनीवरील भूखंडाची एकरी १ कोटी ३० लाख रुपये दराने एमआयडीसी विक्री करीत असल्याबाबत

**(४२) ७९६६८ (२१-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद इंडस्ट्रीयल सिटीतील (ऑरिक) येथे शेतक-यांकडून ५६५ रुपये चौरस फूट म्हणजेच एकरी २३ लाख रुपये दराने खरेदी केलेल्या जमिनीवरील भूखंडाची उद्योगांना ३,२०० रुपये प्रति चौरस फूट म्हणजेच एकरी १ कोटी ३० लाख रुपये दराने एमआयडीसी विक्री करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑरिक सिटीतील २० टक्के भूखंड लघुउद्योगांसाठी राखीव असून २०० रुपये चौरस मीटर हा दर त्यांना परवडणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन लघुउद्योगांना १.५०० ते १.८०० रुपये चौरस या दराने भुखंड उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०७-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
भूसंपादनाचा खर्च,विकास खर्च, अंडरग्राऊंड केबीन,ऑप्टीकल फायबर,वाय-फाय सिस्टीम,स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट,इंटीग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर या सारख्या पायाभूत सुविधा तसेच रस्ते, ओपन स्पेस,ॲमिनीटीज इत्यादीमध्ये कमी होणारी जागा हे सर्व गृहित धरुन भूखंड विक्रीचा दर ठरविला जात असून ठरविण्यात आलेला दर योग्य आहे.

(२) उद्योजकांना प्रोत्साहन देऊन उद्योजकांमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने औद्योगिक भूखंडांना ऑरिकतर्फे ३२०० रुपये चौरस मीटर वाटपाचा दर निश्चित करण्यात आला असून बहुतेक उद्योजकांनी भूखंडाकरिता अर्ज दाखल केले आहेत. या क्षेत्रातील २८ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून ज्या प्लॉटकरिता जास्त अर्ज आले होते तेथे बीडींग केली असता जास्तीत जास्त ४७५०/-प्रति चौ.मी.दर मिळाला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) या पतसंस्थेच्या अवसायकांच्या संथ कारभाराबाबत**

**(४३) ७९९९४ (२१-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) या पतसंस्था ही अवसायानात काढण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पतसंस्थेवर अवसायकांची नेमणूक करण्यात आली, हे ही खरे काय,
(३) असल्यास, अवसायकांच्या संथ कारभारामुळे अनेक ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्यास अडचण निर्माण होत असून नाशिक जिल्हयातील ठेवीदारांच्या शिष्टमंडळाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान अवसायकांची भेट घेऊन तशी मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठेवीदारांना त्यांच्या ठेवी तातडीने अदा करण्याचे दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०७-२०१७) :** (१) व २) हे खरे आहे.
केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांच्या दिनांक २७.१०.२०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर संस्था अवसायनात घेण्यात आलेली असून संस्थेवर श्री. जे. जी. कंडारे, तत्कालीन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांची अवसायक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

संस्था अवसायनात घेण्यात आल्यानंतर कर्ज वसूली व संस्थेच्या मालमत्ता विक्रीमधून उपलब्ध झालेल्या निधीमधून एकूण ७,९०८ ठेवीदारांना रु. ५,५२,७२,२९४/- इतक्या रक्कमेच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत.

सद्यस्थितीत रु. १५,०००/- च्या आतील ठेवीदार व रु. ५,०००/- च्या आतील बचत खाते धारकांना प्राधान्याने निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांना निर्यात व साठवणुकीसाठी शास्त्रीय पद्धतीचे गोडाऊन उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४४) *८०१४३* (१२-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांना निर्यात व साठवणुकीसाठी शास्त्रीय पद्धतीचे गोडाऊन उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापरिणामी यावर्षी झेंडू उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळला नसल्याने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात शेतकऱ्यांनी ठिकठिकाणी फुले फेकून दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने फुल उत्पादक शेतकऱ्यांना शास्त्रीय पद्धतीचे गोडाऊन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०७-२०१७) :**(१) नाही,
(२) नाही,
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.
राज्यात तीन ठिकाणी फुले निर्यात सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. या केंद्रांवरुन गुलाबाच्या फुलांची (स्टेम्स) निर्यात केली जाते. तथापी राज्यातून झेंडू या फुलाची निर्यात होत नाही. झेंडूची फुले प्रामुख्याने राज्यामध्ये दिवाळी, दसरा या सारख्या सणाकरीता वापरली जातात. चालू वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्याने मागणी व पुरवठा यामध्ये विसंगती निर्माण झाल्यामुळे दरात घसरण झालेली होती.

---

**देवरी (जि.गोंदिया) तालुक्यातील शेतकऱ्यांना सावकारी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(४५) *८०४४३* (२१-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी (जि.गोंदिया) तालुक्यातील शेतकऱ्यांना सावकारी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्याबाबत दिनांक १०/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये परवानाधारक सावकारांकडून काही कर्जदारांच्या मूळ कर्ज/गहाण पावत्या दिनांक ३०/११/२०१४ अखेरपर्यंत येणे बाकी

असलेल्या कर्जदारांच्या विहित नमुन्यातील याद्या उपलेखापरीक्षक सहकारी संस्था देवरी तसेच तहसिलदार यांनी नियमितपणे तपासून सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका अर्जुनी-मोरगांव, जि. गोंदिया यांचेकडे चौकशीकरीता पाठविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा एकूण गावातील सावकारांवर सावकारी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व त्याच्यांवर कोणती कारवाई गठीत करण्यात आली वा येत आहे,
(३) शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीअंती पुढे कोणती कार्यवाही केली,नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) देवरी कार्यालयांतर्गत असणाऱ्या २८ परवानाधारक सावकारांपैकी २० सावकारांनी सावकारी कर्जमाफी योजनेंतर्गत प्रस्ताव सादर केले होते. त्यापैकी १९ सावकारांच्या प्रस्तावांना जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिली आहे. उर्वरीत श्री. चरणदास डोंगरे या सावकाराने सदर योजनेंतर्गत सादर केलेली कागदपत्रे बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका अर्जुनी मोरगाव यांनी पोलिस स्टेशन, देवरी येथे दिनांक १७.८.२०१६ रोजी गुन्हा दाखल केला असून सद्यस्थितीत पोलिस तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील शेतकरी, कर्जमाफी योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(४६) ८०४६७ (२१-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर व मोहाडी तालुक्यातील (जि.भंडारा) कर्जमाफी योजनेस पात्र लाभार्थी अधिकाऱ्यांच्या चुकीच्या धोरणामुळे सावकारी कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.सहकार मंत्री यांना दिनांक ६ फेब्रुवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,श्री.केशवलाल माणिक दमाहे, रा.देव्हाडी ता.तुमसर जि.भंडारा, सौ.संगीता तुळशीराम दमाहे, रा.रामपूर (हमेशा) ता.तुमसर जि.भंडारा आणि श्री.गजानन महादेव किरणापुरे, रा.उमरवाडा ता.तुमसर जि.भंडारा यांनी विहित मुदतीत दाखल केलेल्या सावकारी कर्जमाफी अर्जाचे योग्य तपासणी न करता अधिकाऱ्यांनी अपात्र केले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळलेल्या संबंधीतांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०७-२०१७) :** (१) होय.

(२) खरे नाही.

परवानाधारक सावकारांकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासन निर्णय क्र. एमएलए १०१५/प्र.क्र.२५/७-स, दिनांक:- १०.०४.२०१५ मधील लाभार्थींच्या पात्रतेच्या निकषांची पुर्तता करणाऱ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना**
**व इतर योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांना मिळणेबाबत**

**(४७) ८१००७ (२१-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **विशेष सहाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती जिल्हा यवतमाळ यांनी दिनांक २६ डिसेंबर,२०१६ रोजीच्या सभेत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम अंतर्गत येत असलेल्या संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना व यासारख्या इतरही योजनांचा फायदा अधिकाधिक लाभार्थ्यांना मिळणेबाबत सूचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू योजनांचे लाभार्थी सर्वे हा सन २००२ पर्यंतचाच असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रमांतर्गत असलेल्या योजनातून होत असलेला फायदा हा २००२ नंतर सर्व निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्तीस मिळत नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक प्रशासनाकडून नवीन लाभार्थी होणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१७) :** (१) होय,

(२) व (३) सन २००२ मधील दारिद्रय रेषेच्या सर्व्हेनुसार आणि विशेष सहाय्य कार्यक्रमासंदर्भातील दि.२६.१०.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या उत्पन्नाच्या व इतर निकषांस अनुसरून लाभार्थी मंजुरीची प्रक्रिया निरंतर सुरू आहे.

(४) नवीन लाभार्थीची निवड करण्याबाबत शिबीरांचे आयोजन केले जाते. तसेच तलाठी यांचेकडूनसुध्दा अर्जदारांची प्रकरणे प्राप्त करून घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खव्याची प्रमुख बाजारपेठ असलेला नांदुरा तालुक्यातील खवा व्यावसायिकांच्या विविध अडचणीबाबत**

**(४८) ८१४३९ (२१-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भासह राज्यात खव्याची प्रमुख बाजारपेठ असलेला नांदुरा तालुक्यातील खवा व्यावसायिकांना शासनाकडून सोयी-सुविधा तसेच जागा, अनुदान मिळत नसल्याने हा खवा उद्योग अडचणीत आला आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खवा उद्योगास चालना देण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०७-२०१७) :**(१) व (२) नांदुरा तालुक्यातील खवा उद्योगास चालना देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक समुह विकास योजनेंतर्गत मौजे. लोणवाडी येथे लोणवाडी व परिसरातील गावांतील ६२ खवा उद्योगांचा एक खवा निर्मिती औद्योगिक समुह सन २०१४-१५ मध्ये स्थापन करण्यात आला आहे.

सदर औद्योगिक समुहास क्षमतावृध्दी कार्यक्रमांतर्गत कौशल्यविकास कार्यक्रम अंमलबजावणीसाठी उद्योग संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्रमांक बी-१२७०८, दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ अन्वये एकुण किंमत रु. ९.७५ लक्ष पैकी ६०टक्के शासकीय अनुदानाचा पहिला हप्ता रु. ५.२६ लक्ष वितरित करण्यात आलेला असून त्यानुसार राज्याबाहेरील (गुजरात येथील आनंद व विद्या डेअरी) व राज्यातील खवा उत्पादक उद्योग व संस्थान (कृषी महाविद्यालय, वरूड, तालुका पुसद ) येथे भेटी व तीन दिवसीय प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

सदर औद्योगिक समुहास खवा उत्पादन प्रात्यक्षिक केंद्रासाठी रु. १.५५ लक्ष किंमतीचे आधुनिक तंत्रज्ञानयुक्त २ खवा निर्मिती यंत्रे विकत घेऊन प्रात्यक्षिकासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

याशिवाय खवा व्यावसायिकांना शासनाकडून नानाविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्य शासनामार्फत निराधार ज्येष्ठ नागरिक, अपंग,महिलांसाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यामार्फत देण्यात येणा-या अनुदानाबाबत.**

**(४९) ८२३९३ (२१-०४-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **विशेष सहाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने निराधार ज्येष्ठ नागरिक, अपंक तसेच विविध महिलांसाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यामार्फत उपजिविका भागविण्यासाठी महिन्याला ६०० रुपये अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही रक्कम दर महिन्याला बँकेत जमा होत असून ती वेळेवर मिळत नसल्याने अकोला जिल्ह्यातील लाभार्थ्यांना १० कि.मी. अंतर कापून वारंवार बँकेत जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वी हे अनुदान पोस्टाद्वारे घरपोच मिळत होते परंतु आता बँकेत जमा होत असल्याने त्याचा त्रास वृद्ध, अपंग, महिलांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेतील अनुदान लाभार्थ्यांना पोस्टाद्वारे घरपोच मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१७) :** (१) होय.

(२) अकोला जिल्हयातील लाभार्थ्यांचे अनुदान दरमहा विहीत मुदतीत त्यांच्या खात्यावर पाठविण्यात येत असून लाभार्थ्यांना वारंवार बँकेत जावे लागत नाही. परंतु मुर्तिजापूर व अकोला तालुक्यांमध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे माहे जानेवारी, २०१७ चे अनुदान काही तांत्रिक अडचणीमुळे वेळेत लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करणे शक्य झाले नव्हते.

(३) सदर योजनेच्या लाभार्थ्यांनी त्यांचे बँक खाते त्यांना सोईस्कर असलेल्या बँकेत उघडण्यात आलेले असल्यामुळे त्याचा त्रास वृध्द, अपंग महिलांना होत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धोबी समाजाचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करण्याबाबत**

**(५०) ८२६६८ (०६-०५-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धोबी समाजाचा समावेश इतर मागासवर्ग या प्रवर्गात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोबी समाजाचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करण्यात आलेला असतानाही शासनाच्या चुकीमुळे त्यांचा समावेश इतर मागास वर्गात झाला, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, शासनाने आपली चूक दुरुस्त करून तातडीने धोबी समाजाचा समावेश अनुसूचित जातींमध्ये करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २७ ऑगस्ट,२०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१७)** : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशतः खरे आहे. अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २७ जुलै, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.
(४) "धोबी" जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीत करावा या विषयी प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने सदर बाब तपासण्याकरिता डॉ. डी. एम. भांडे यांच्या अध्यक्षतेखाली दि.५/९/२००१ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ५ मार्च, २००२ रोजी शासनास सादर केला होता. त्या समितीने धोबी व तत्सम समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करावा अशी शिफारस केली होती.

सदर अहवाल केंद्र शासनाकडे शिफारस करण्यासाठी मा.मंत्री (सा.न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीपुढे ठेवण्यात आला असता अनुसूचित जाती बाबत अभ्यास करणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून याबाबत अभिप्राय मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून दि.१३/५/२००२ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, अनुसूचित जातीच्या यादीत एखाद्या जातीचा समावेश करण्यासाठी असलेला "अस्पृश्यता" हा निकष धोबी जात पूर्ण करीत नाही.

मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार सदरचे दोन्ही अहवाल दि.१३/४/२००५ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. केंद्र शासनाकडून या प्रकरणी अद्यापी निर्णय प्रलंबित आहे. सदर प्रकरणी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

तथापि, मा.मंत्री (सा.न्याय) अध्यक्षतेखाली दि.२५/०३/२०१७ रोजी पार पडलेल्या बैठकीत धोबी परिट समाजाचा अनुसूचित जातीत समावेश करण्याकरिता डॉ.भांडे समितीचा अहवाल पुन्हा केंद्र शासनाला पाठविण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.